# शिकू आनंदे

सौ.अनघा पोंक्षे. ९०२८४६९२००
सहकारी सदस्य
टी.बी.लुल्ला चॅरिटेबल फाउंडेशन

सांगली येथील टी.बी.लुल्ला चॅरिटेबल फाउंडेशनचे संस्थापक श्री.किशोर लुल्ला यांनी २०१४ पासून शिकू आनंदे हा उपक्रम सुरु केला. त्यांनी जिल्ह्यातील शाळांमधील बालवाडया दत्तक घेतल्या आणि तेथे बालकेंद्री पद्धतीने शिक्षण सुरु केले. आज पाच वर्षानंतर या फाउंडेशनच्या टीमने त्यांनी दत्तक घेतलेल्या शाळा आणि इतर शाळा यांचे सर्वेक्षण केले. त्याचे निष्कर्ष मी येथे आज पुस्तक दिनाच्या निमित्ताने मांडत आहे. बालवाडयामधून दिले जाणारे शिक्षण त्यांचा शिक्षणक्रम (अभ्यासक्रम) कसा असावा याबद्दल अनेक विचारवंतानी आपले विचार मांडले आहेत. बालशिक्षण हे मुलांच्या भावविश्वाशी निगडीत असावे, अनुभवांना कृतीची जोड देणारे असावे. मुलांना अनुभव घेवू द्यायचे असतात, अनुभव शिकवायचे नसतात. विविधांगी अनुभवाच्या संधी उपलब्ध करून द्यायच्या असतात. हे जरी असे असले तरी दुर्दैवाने आजही अनेक बालवाड्यांमध्ये आणि पहिली दुसरीमध्ये मात्र पारंपारिक पद्धतीनेच नुसत्या घोकंपट्टीने मुलांना शिकवले जाते. अगदी नावाजलेल्या शिक्षण संस्थामधून जिथे बालवाडीसाठी ५००० ते १०,००० फी आकारली जाते . तेथे मुलांच्याकडून १ ते १०० अंक अक्षरशः पोपटपंची करून घोकून पाठ करून घेतले जातात. मुले यांत्रिकपणे १ ते १०० अंक लिहितात, म्हणतात. पण यामुळे खरे संख्याज्ञान मुलांना झालेले असते का? नसतेच यापेक्षा कहर म्हणजे संपूर्ण मुळाक्षरे, बाराखडीच मुलांच्याकडून पाठ करून गिरवून घेतली जाते. अक्षरशः २०० पानी वह्या नुसत्या कारकुनीने भरलेल्या असतात आणि वेडेपणा पहा, पालकांना याचा अभिमान वाटतो. परंतु ते किती मुलांना समजले असते हा प्रश्नच? या गटातील मुलांना खाजगी क्लासही लावले असतात आणि क्लासमध्ये तरी काय हो वेगळे. नुसते अर्थ न समजणाऱ्या अंकाचे, अक्षरांचे शब्दांचे लेखनच की. वयाच्या ३ ते ६ वर्षाच्या मुलांना हे शिक्षण पेलण्यासारखे आहे का? किती हा अभ्याक्रमाचा बोजा त्यांच्यावर लादलेला असतो, त्यांच्यावर हा अन्यायच नाही का? मी म्हणते पालक तरी हे कसे सहन करून घेतात? खरे तर पालकांनाच मुल अडीच तीन वर्षाचे झाले की कधी त्याला शाळेत घालीन व स्वत:ची सुटका करून घेईन अशी जणू घाईच झालेली असते.

५००० ते १०००० रु. फी घेऊन असे काय वेगळे शिकवेल जाते? नुसते पोपटपंची करणारे पोपटच मशीनमध्ये घालून बाहेर काढले जातात. इथे मुलांची विचार शक्तीच खुंटवली जाते. १ ते १०० अंकात व बाराखडीत मुलांचे बालपणच हरवून जाते. याउलट काही बालवाडयातर दोन चार गाणी व डबाखान यासाठीच जणू भरवलेल्या असतात. या सगळ्या जीवघेण्या स्पर्धत मुलांचा सर्वांगीण विकासाच संपतो. आज बालवाडीमध्येही चक्क सेमी इंग्रजीचे भूत नाचतय हे म्हणजे "धोबी न घाटका न घर का" आणि आम्ही शिक्षक हे निमुटपणे स्वीकारून बिनबोबाट मुलांच्यावर हे लादतोही.

आज प्रगत राष्ट्रात 'मेंदू आधारित' शिक्षणाची संकल्पना रूढ होत आहे आणि आम्ही मात्र या पोपटपंचीच्या भोवऱ्यात अडकून पडलो आहे.

'ग्राममंगल (रमेश पानसे)', फुलोरा, क़्वेस्ट संस्थेकडून प्रशिक्षलेल्या बालवाड्या (निलेश निमकर), कमला निमकर भवन (मंजिरी निमकर) या व काही प्रायोगिक तत्वावर चालवल्या जाणाऱ्या बालवाडयांमधील अभ्यासक्रम मात्र बालमानसशास्त्राच्या शास्त्रोक्त पद्धतीवर आधारलेला आहे. आणि याच धर्तीवर सांगली व सांगली परिसरातील

काही लुल्ला फाउंडेशन ने चालवलेल्या बालवाडया आणि पहिली दुसरी ज्या मी पहिल्या व अभ्यासलेल्या आहेत, तिथे मात्र बालकेंद्री शिक्षण पद्धतीचा अवलंब करून कृतीयुक्त अध्यापनाचा वापर केला जात आहे. बालकांच्या अनुभवाला कृतीची जोड दिली जात आहे.

गणितानुभवामध्ये नुसते अंक परिचय व पाठांतरावर भर न देता गणनपूरक संकल्पना (तुलना, वर्गीकरण, क्रमवारी) गणिती शब्दांचा विकास, मुलांना स्पष्ट करून दिल्या जातात. संख्याज्ञान देत असताना १ ते २० अंक, अंकाची मोजणी, संख्यानाम व संख्या चिन्हांची सांगड, परिसरातील विविध वस्तूंची (झाडाची पाने, खडे, बिया, मणी, काड्या, बाटल्या त्यांची टोपणे) वापर करून मुलांच्या अनुभवाला कृतीची जोड दिल्यामुळे मुले आनंदाने पोपटपंची न करता स्वानुभवातून शिकत आहेत. १ ते २० अंक, आधीची नंतरची संख्य, सहज अमूर्त पातळीवर ओळखतात, सांगतात. साहित्याला कृतीची जोड असल्यामुळे १० ते २० संख्यामधील दशकाचा गठ्ठा व एकक संकल्पना मुलांना अवगत झाल्या आहेत. मापन भौमितिक आकार, अपूर्णांकमधील अर्ध्या, पाव ह्या संकल्पना ही त्यांच्या विविध साहित्यातून स्पष्ट झाल्या आहेत. विज्ञानातील जड हलका, बुडणे तरंगणे हे प्रयोग स्वत: करून त्याचा आनंद घेत आहेत.

बालवाडीतील मुलांना खूप बोलायचे असते. आपले अनुभव सांगायचे असतात, विचार भावना चित्रातून व्यक्त करायच्या असतात. पण मुळाक्षरे व बाराखडीच्या नादात आपण मुलांना व्यक्त होण्याची संधीच देत नाही, त्यांचा सभाधीटपणाच हिरावून घेतो.

सहभागीवाचन (वयानुरूप गोष्टीची पुस्तके वाचन) यामधून मुलांची शब्द संपत्ती वाढवून वाचन लेखनाची पूर्वतयारी करून घेऊन मुलांना आनंदाने वाचन लेखनाकडे वळवले जात आहे.

या बालवाडयामधून पहिली दुसरीतून मुले रचनावादातून आनंदाने, भयमुक्त वातावरण स्वानुभवातून निर्भीडपणे शिकत आहेत. मुलांची एकाग्रता, वैचारिक पातळी, बौद्धिक पातळीत वाढ होत आहे. मुलांचा सर्वांगीण विकास होत आहे.

scert चा ‘आकार’ अभ्यासक्रम नुकताच करण्यात आलाय. तो चांगला असून तो बालवाड्यांपर्यंत पोहोचविणे, शिक्षकांना प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे.  बालशाळांनी शास्त्रोक्त बालशिक्षणक्रमाचा स्विकार व स्वागत करून आपल्याच बालकांचे भवितव्य उज्वल करावे

टी.बी.लुल्ला चॅरिटेबल फाउंडेशन पुरस्कृत यशस्वीरीत्या सुरु असलेल्या शाळा खालीलप्रमाणे.

१) श्री. सिद्धिविनायक प्राथमिक शाळा, यशवंतनगर, कुपवाड सांगली
२) कै. सौ. अनुराधा किल्लेदार नवजीवन प्रशाला, सांगली
३) नवीन मराठी प्राथमिक शाळा विश्रामबाग, सांगली
४) गोविंदराव लिमये प्राथमिक शाळा आष्टा.
५) प्राथमिक शाळा संजयनगर सांगली
६) समर्थ प्राथमिक आश्रमशाळा बेडग